लोकमत

# तंत्रज्ञान आणि परिवर्तन अधिक संदर्भात्मक बनविण्याची गरज

## सी. पी. गुरनानी : आयआयएम नागपूरच्या तीनदिवसीय परिषदेचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : आयआयएम नागपूरच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी यांनी तंत्रज्ञान आणि परिवर्तन अधिक संदर्भात्मक बनविण्याचे आवाहन केले आहे. व्यवस्थापनाच्या क्षेत्रात अनेक आव्हाने आहेत, पण आव्हानावर मात करून समस्यांवर उपाय शोधण्यासाठी स्वत:ला पुनर्स्थापित करणे महत्त्वाचे ठरते. प्रतिभा, तंत्रज्ञान आणि प्रक्रिया रिफ्रेश करून परिवर्तन घडवून आणण्याचे आवाहन त्यांनी केले.

आयआयएम नागपूरतर्फे तीनदिवसीय प्रीतम सिंह स्मृती परिषदेच्या दुसऱ्या आवृत्तीचे गुरुवारी आयआयएम नागपूर येथे उद्घाटन झाले. 'लिडिंग दि बिझनेस ऑफ फ्यूचर : बदलत्या जगात प्रतिभा, परिवर्तन आणि तंत्रज्ञान' या संकल्पनेवरील परिषदेत ५०० हून अधिक डेलिगेट्स सहभागी झाले असून, ७४ समांतर विषयावर चर्चा घडणार आहे. याप्रसंगी आयओसीएलचे एचआर संचालक रंजनकुमार मोहपात्रा, बिर्ला व्यवस्थापन तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. हरिवंश चतुर्वेदी, आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, शिवा कक्कड, प्रा. अलोककुमार सिंह, राम पपी रेड्डी अन्नपूरेड्डी, आदी उपस्थित होते.



आयआयएम नागपूरच्या परिषदेचे उद्घाटन करताना रंजन कुमार मोहपात्रा, भीमराया मेत्री व इतर.

रंजन कुमार मोहपात्रा म्हणाले, भौतिक परिस्थिती आणि यश एका रात्रीत नाहीसे होऊ शकतात, हे लोकांना कोरोना काळात समजले. ज्ञान हे निहित आणि स्पष्ट असले पाहिजे. वर्तमानात कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामातून चांगली परिस्थिती आणि समाधान हवे असते. एचआरला तंत्रज्ञानामध्ये होणारे परिवर्तन समजून घेणे आणि ते चांगले कार्य करण्यासाठी उपयोगात आणणे समजले पाहिजे. अनुभवी आणि नवीन कर्मचाऱ्यांमध्ये पूल बांधण्यासाठी एचआरने अधिक सक्रिय असणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

डॉ. भीमराया मेत्री यांनी आयआयएम नागपूर ही एक सर्वांगीण बिझनेस स्कूल येथे मूल्य-आधारित नेते, जागतिक व्यवस्थापक आणि भक्कम वैचारिक पाया आणि विश्लेषणात्मक मानसिकता असलेले उद्योजक विकसित होतील, असा विश्वास व्यक्त केला. पिपल लॅबचे सीईओ डॉ. सुब्रत कुमार यांनी आभार मानले.